## नोव्हेंबर महिन्यातील दैनिक ॲग्रोवन मधील बातम्या

| क्र. | दिनांक | पान नं. | कॉलम सेमी | आशय (१ नोव्हेंबर) | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ नोव्हेंबर | १ | ३८४.२५ | दूध दरात अखेर वाढ ! | दूध-व्यवसाय |
| २ | १ नोव्हेंबर | १ | १९४.२५ | द्राक्षविमा पॉलिसीचे स्वरुप बदलणार | फळे |
| ३ | १ नोव्हेंबर | १ | २०४ | केंद्राने कर्जमाफी केल्यास राज्य सहकार्यास तयार | राजकीय |
| ४ | १ नोव्हेंबर | २ | २२८ | अग्रलेख | अग्रलेख |
| ५ | १ नोव्हेंबर | २ | १६७.५ | कोकणतील शेती फायद्याची नाही | वाचकांचा पत्रव्यवहार |
| ६ | १ नोव्हेंबर | २ | ३२३ | पूरक अन्नाचे पीक: रताळे | राजकीय |
| ७ | १ नोव्हेंबर | ३ | १४० | कोरडवाहू शेती संदर्भात लवकरच महत्वाचे निर्णय: आर. आर. पाटील | आंदोलने |
| ८ | १ नोव्हेंबर | ३ | ११२.७ | पाच एकराखालील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे | इतर बातम्या |
| ९ | १ नोव्हेंबर | ३ | १३२.३ | मोफत औषधांवर दहापट शुल्क आकारणी | इतर बातम्या |
| १० | १ नोव्हेंबर | ३ | १७० | कृषीकन्यांनी केली पहिल्या वनराई बंधाऱ्याची निर्मिती | अन्नधान्य |
| ११ | १ नोव्हेंबर | ४ | १५१.७ | जिल्ह्यात दहा टक्के क्षेत्रावर प्रकल्प राबविला तरी उद्दिष्ट साध्य | इतर बातम्या |
| १२ | १ नोव्हेंबर | ४ | १७४.२५ | नाशिक भागात आणखी सात हजार एकर शेतजमिनीवर आरक्षण | राजकीय |
| १३ | १ नोव्हेंबर | ४ | १८०.४ | अन्यत: हिवाळी अधिवेशन चालवू देणार नाही: मुंडे | आंदोलने |
| १४ | १ नोव्हेंबर | ४ | ७२ | शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची रिपाईंकडून मागणी | अन्नधान्य |
| १५ | १ नोव्हेंबर | ५ | २३७.१५ | कडधान्य उत्पादनवाढीसाठी पहिल्या टप्प्याचे काम सुरु | राजकीय |
| १६ | १ नोव्हेंबर | ५ | २०४ | कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी दत्तात्रय साळोखे | इतर बातम्या |
| १७ | १ नोव्हेंबर | ५ | १०० | वकृत्वाच्या सहाव्या आवृत्तीचे प्रकाशन | इतर बातम्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | १ नोव्हेंबर | ५ | १०० | डॉ. देशपांडे यांची राहूरीला बदली | पीके |
| १९ | १ नोव्हेंबर | ६ | ४३३.५ | भाजीपाला पिकांचे व्यवस्थापन | फळे |
| २० | १ नोव्हेंबर | ७ | ५७३.७५ | केळीचे जागतिक महत्व वाढतेय. | अन्नधान्ये |
| २१ | १ नोव्हेंबर | ७ | २६७.७५ | जगप्रसिध्द वॉल्ट डिस्ने कंपनीची अन्न आणि पोषण विषयावर लघुपट मालिका | पीके |
| २२ | १ नोव्हेंबर | ८ | ८६७ | कोरफड, तूर आणि टरबूज एकत्रित पीक पध्दतीचा प्रयोग | फळे |
| २३ | १ नोव्हेंबर | ९ | ८६७ | सावरगावच्या शिंदे यांची फळबागांची 'कृषी पंढरी' | आयात-निर्यात |
| २४ | १ नोव्हेंबर | १० | ८६७ | बाजारभाव | फुले |
| २५ | १ नोव्हेंबर | ११ | ३५७ | दुबईतील फुलबाजार: भारतीयांना संधी | अन्नधान्ये |
| २६ | १ नोव्हेंबर | ११ | ५१० | सेंद्रीय मस्त्योत्पादनांना युरोपात मागणी | पर्यावरण |
| २७ | १ नोव्हेंबर | १४ | ६० | हवामान | कृषी-सल्ला |
| २८ | १ नोव्हेंबर | १४ | ३० | कृषीसल्ला | फळे |
| २९ | १ नोव्हेंबर | १४ | ४७० | आठवड्याचा द्राक्ष सल्ला | दूध व्यवसाय |
| ३० | १ नोव्हेंबर | १४ | २३५.७५ | आधुनिक पध्दतीचा गोठा बांधणीची पध्दती | उद्योगधंदे |
| ३१ | १ नोव्हेंबर | १५ | ६८८.५० | रेशीम अबीचे जीवनचक्र | पीके |
| ३२ | १ नोव्हेंबर | १५ | १४७.९० | भाजीपाला पिकांचे व्यवस्थापन | इतर बातम्या |
| ३३ | १ नोव्हेंबर | १६ | १६० | भारताची बाजू वरचढ: अक्रम | इतर बातम्या |
| ३४ | १ नोव्हेंबर | १६ | १६० | पॅकिंगच्या नियमातील बदलाची जानेवारीपासून अंमलबजावणी | राजकीय |
| ३५ | १ नोव्हेंबर | १६ | १७० | मुकेश अंबानी सर्वात श्रीमंत नव्हेत. | राजकीय |
| ३६ | १ नोव्हेंबर | १६ | १७० | राष्ट्रवादीला १९, शेतकरी ला ७ जागा. | राजकीय |

| क्र. | दिनांक | पान नं. | कॉलम सेमी | आशय (८नोव्हेंबर) | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८ नोव्हेंबर | १ | १९२ | ॲग्रोवनच्या कृषीप्रदर्शनाचे १७ ला उद्‌घाटन् | कार्यशाळा |
| २ | ८ नोव्हेंबर | १ | २८.५ | शेतकऱ्यांच्या कर्जाविषयी १५ रोजी दिल्लीत बैठक! पवार | राजकीय |
| ३ | ८ नोव्हेंबर | २ | २२८ | अग्रलेख | अग्रलेख |
| ४ | ८ नोव्हेंबर | २ | १६७.५ | मोफत वीजेसाठी तरतूद हवी. | वाचकांचा पत्रव्यवहार |
| ५ | ८ नोव्हेंबर | २ | ३२३ | हवामानातील बदलांचा कृषी क्षेत्रावर परिणाम | पर्यावरण |
| ६ | ८ नोव्हेंबर | ३ | ३४४.२५ | काळाची गरज ओळखून ठिबकाचा वापर करावा | पीके |
| ७ | ८ नोव्हेंबर | ३ | १७० | निर्मल ग्रामसाठी अधिकारीच जेंव्हा रस्त्यावर उतरतात. | आंदोलने |
| ८ | ८ नोव्हेंबर | ३ | १३०.५ | ऊस शेती ज्ञानलक्ष्मी महिला शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | पीके |
| ९ | ८ नोव्हेंबर | ४ | १९१.२५ | कोकणातील नरकचतुर्दशी ... आणि नरकासुराचे दहन. . . . | इतर बातम्या |
| १० | ८ नोव्हेंबर | ४ | २८८.१५ | ॲग्रोवनच्या कृषीप्रदर्शनाचे १७ ला उद्‌घाटन् | कार्यशाळा |
| ११ | ८ नोव्हेंबर | ४ | १५३ | शेतकऱ्यांच्या कर्जाविषयी १५ रोजी दिल्लीत बैठक! पवार | राजकीय |
| १२ | ८ नोव्हेंबर | ५ | १६४ | 'गोकुळ श्री' स्पर्धेत जाफराबादी म्हैस व गंगा गाय प्रथम | दूध व्यवसाय |
| १३ | ८ नोव्हेंबर | ५ | ८४ | भारत संशोधन कैंद्रातील शास्त्रज्ञांची बैठक | पीके |
| १४ | ८ नोव्हेंबर | ५ | १०८ | काळ्याबाजारातील ४४४ क्विंटल धान्य जप्त | अन्नधान्य |
| १५ | ८ नोव्हेंबर | ५ | १२० | मुदतबाह्य धनादेश ३१ डिसेंबर पर्यत स्विकारणार | इतर बातम्या |
| १६ | ८ नोव्हेंबर | ५ | ९० | जानेवारीत रेशन व रॉकेल दुकाने बचतगटांकडे | इतर बातम्या |
| १७ | ८ नोव्हेंबर | ५ | ४० | राहूरी विद्यापीठात यादी जाहीर | शैक्षणिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | ८ नोव्हेंबर | ५ | ४० | कोल्हापूरात गुळाचे शनिवारी सौदे | आयात-निर्यात |
| १९ | ८ नोव्हेंबर | ६ | ४३३.५ | कांदेबाग केळीच्या अधिक उत्पादनासाठी | फळे |
| २० | ८ नोव्हेंबर | ७ | ४३३ | शेतीबरोबर जोडधंद्यातही यशस्वी झालेली महिला | उद्योगधंदे |
| २१ | ८ नोव्हेंबर | ७ | २३१ | जगातील जनावरांच्या जातीचे संवर्धन करण्यासाठी कृती आराखडा | पीके |
| २२ | ८ नोव्हेंबर | ७ | १८१.५ | हवामान बदल, पाणी टंचाई या भात उत्पादनातील समस्या | नवीन प्रयोग |
| २३ | ८ नोव्हेंबर | ८ | ८६७ | प्रणव ॲग्रो इंडस्ट्रिज ची अन्नप्रक्रिया उद्योगात भरारी | अन्नधान्य |
| २४ | ८ नोव्हेंबर | ९ | ४२०.७५ | आदिवासी महिला करताहेत स्ट्रॉबेरीची सामूहिक शेती | फळे |
| २५ | ८ नोव्हेंबर | ९ | ४५० | अभ्यासू वृत्तीने तरुण व्यापारी रेशीम शेतीत करतोय प्रगती | उद्योगधंदे |
| २६ | ८ नोव्हेंबर | १० | ८६७ | बाजारभाव | आयात-निर्यात |
| २७ | ८ नोव्हेंबर | ११ | ६६३ | तामिळनाडूची फुलशेतीत आघाडी | फुले |
| २८ | ८ नोव्हेंबर | ११ | २०४ | यंदाच्या वर्षात खरीप तेलबिया पिकांच्या उत्पादनात २० टक्क्यांनी वाढ अपेक्षित | पीके |
| २९ | ८ नोव्हेंबर | १४ | ३९९.७५ | केळीवरील करवा रोगाचे निर्यंत्रण कसे करावे? | कृषी सल्ला |
| ३० | ८ नोव्हेंबर | १४ | ६० | हवामान | पर्यावरण |
| ३१ | ८ नोव्हेंबर | १४ | ३० | कृषी सल्ला | कृषी सल्ला |
| ३२ | ८ नोव्हेंबर | १४ | २६७.७५ | आठवड्याचा द्राक्ष सल्ला | फळे |
| ३३ | ८ नोव्हेंबर | १५ | ८६७ | किटकसंगोपन गृहाचे नियोजन | उद्योगधंदे |
| ३४ | ८ नोव्हेंबर | १६ | ९९ | राज्य जलतरण स्पर्धेत ॲड. थोरात प्रथम | इतर बातम्या |
| ३५ | ८ नोव्हेंबर | १६ | १५३.७५ | देशाला चांगल्या नेतृत्वाची गरज... कलाम | राजकीय |
| ३६ | ८ नोव्हेंबर | १६ | ९० | आणिबाणी विरोधात रस्त्यावर उतरा... भुत्तो | इतर बातम्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | ८ नोव्हेंबर | १६ | ९० | 'ओ' रक्तगटातील बालकांना मलेरियाचा कमी धोका! | इतर बातम्या |
| ३८ | ८ नोव्हेंबर | १६ | १८३.७५ | ट्रकखाली चिरडून मोटरसायकलीवरील ५ ठार | इतर बातम्या |

| क्र. | दिनांक | पान नं. | कॉलम सेमी | आशय (१५ नोव्हेंबर) | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ नोव्हेंबर | १ | ३९५.२५ | प्रात्यक्षिकांनी गजबजलेले कृषी महाविद्यालयाचे शिवार | शैक्षणिक |
| २ | १५ नोव्हेंबर | १ | २६७.७५ | लाखोडी वरील बंदी किती काळ? | आंदोलने |
| ३ | १५ नोव्हेंबर | २ | २२८ | अग्रलेख | अग्रलेख |
| ४ | १५ नोव्हेंबर | २ | १६७.५ | अल्पभूधारकांना मार्गदर्शनाची गरज | वाचकांचा पत्रव्यवहार |
| ५ | १५ नोव्हेंबर | २ | ३२३ | अमेरिकेच्या प्रगतीत कृषी प्रदर्शनाचे योगदान | नवीन प्रयोग |
| ६ | १५ नोव्हेंबर | ३ | ८६७ | होर्किम, ब्रोकोली , लेट्युस, चायनिज कोबी, लाल मुळा लागवडीचे तंत्र | पीके |
| ७ | १५ नोव्हेंबर | ४ | ६९.७५ | प्रात्यक्षिकांनी गजबजलेले कृषी महाविद्यालयाचे शिवार | शैक्षणिक |
| ८ | १५ नोव्हेंबर | ४ | १५६ | आव्हानांवर मात करण्याची कृषी क्षेत्रात क्षमता: पवार | राजकीय |
| ९ | १५ नोव्हेंबर | ४ | १०४ | १२९ बाजारसमित्यांच्या निवडणुकांचा आज आदेश | राजकीय |
| १० | १५ नोव्हेंबर | ४ | २२० | लाखोडी वरील बंदी किती काळ? | आंदोलने |
| ११ | १५ नोव्हेंबर | ५ | १९१.२५ | ग्रामपंचायत इमारत दुरुस्तीसाठी कालबध्द कार्यक्रम | इतर बातम्या |
| १२ | १५ नोव्हेंबर | ५ | १२० | जैविक किटकनाशक प्रकल्पासाठी केद्रशासनाचे २५ टक्के अर्थसहाय्य | पीके |
| १३ | १५ नोव्हेंबर | ५ | १२० | तंटामुक्तीत महिलांचा पुढाकार महत्वाचा | राजकीय |
| १४ | १५ नोव्हेंबर | ५ | १५३.७५ | कृ.उ. बा.स. विभाजनाचा प्रस्ताव रद्द. | आयात निर्यात |
| १५ | १५ नोव्हेंबर | ५ | २२९.५ | शेतीत नव्या तंत्राची वाट चोखाळावी : भालेराव | नवीन प्रयोग |
| १६ | १५ नोव्हेंबर | ६ | ४३३ | नवलकोल लागवडीचे व्यवस्थापन | पीके |
| १७ | १५ | ७ | ४३३ | चीन, जपानच्या सहाय्याने भारत करणार | नवीन |

| | | | | | संशोधन |
|---|---|---|---|---|---|
| १८ | १५ नोव्हेंबर | ७ | ४३३ | कोरडवाहू भागातील शेतीविषयी प्रशिक्षण घ्यायचे | शैक्षणिक |
| १९ | १५ नोव्हेंबर | ८ | ८६७ | केळी केवळ खाण्यासाठी नव्हेत तर बहुउपयोगासाठी | फळे |
| २० | १५ नोव्हेंबर | ९ | ८६७ | केळी केवळ खाण्यासाठी नव्हेत तर बहुउपयोगासाठी | फळे |
| २१ | १५ नोव्हेंबर | १० | ८६७ | बाजारभाव | आयात निर्यात |
| २२ | १५ नोव्हेंबर | ११ | ६२४.७५ | जळगांवची भरीताची वांगी बाजारात दाखल | आयात निर्यात |
| २३ | १५ नोव्हेंबर | ११ | २४२.२५ | गुलाबाला आता झेंडू निशिगंधाची स्पर्धा | फुले |
| २४ | १५ नोव्हेंबर | १४ | १५३.७५ | उन्हाळी कांदा लागवड कशी करावयाची | पिके |
| २५ | १५ नोव्हेंबर | १४ | ६० | हवामान | पर्यावरण |
| २६ | १५ नोव्हेंबर | १४ | ३० | कृषी सल्ला | कृषी सल्ला |
| २७ | १५ नोव्हेंबर | १४ | ४२५ | आठवड्याचा द्राक्ष सल्ला | फळे |
| २८ | १५ नोव्हेंबर | १५ | ८६७ | रेशीम किटक संगोपनाची पध्दती | उद्योगधंदे |
| २९ | १५ नोव्हेंबर | १६ | ११६ | गुजरात निवडणुकीची आज आधी सूचना | राजकीय |
| ३० | १५ नोव्हेंबर | १६ | २०० | जीडीपी तील शेतीचा वाटा आणखी घसरण्याची शक्यता | नुकसान |
| ३१ | १५ नोव्हेंबर | १६ | २१० | ७५ ओलांडलेल्या महिला शेतकऱ्यांचा सत्कार | इतर बातम्या |
| ३२ | १५ नोव्हेंबर | १६ | २२० | शिवसेनेच्या कर्जमुक्तींची विदर्भात उत्सुकता | राजकीय |

| क्र. | दिनांक | पान नं. | कॉलम सेमी | आशय (२२ नोव्हेंबर) | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२ नोव्हेंबर | १ | ३०६ | उद्यमशील शेतकरी घडवणाऱ्या नव्या चळवळीचा प्रारंभ | राजकीय |
| २ | २२ नोव्हेंबर | २ | २२८ | अग्रलेख | अग्रलेख |
| ३ | २२ नोव्हेंबर | २ | १६७.५ | शेतकरीच शेतीचा मारेकरी | वाचकांच पत्रव्यवहार |
| ४ | २२ नोव्हेंबर | २ | ३२३ | विकासाशिवाय देशात शांतता नांदणार नाही | नवीन प्रयोग |
| ५ | २२ नोव्हेंबर | ३ | १४४ | आत्महत्येच्या विचाराला शेतकऱ्याने दिली तिलांजली | इतर बातम्या |
| ६ | २२ नोव्हेंबर | ३ | २८८ | ॲग्रोवनचे प्रदर्शन पाहून अमेरिका भारावली | कार्यशाळा |
| ७ | २२ नोव्हेंबर | ३ | ३५७ | द्राक्षाच्या आदर्श शेतीमुळे अश्रूंची झाली फुले | फळे |
| ८ | २२ नोव्हेंबर | ४ | ३५७ | प्रमोद नवलकर यांना विधीमंडळात श्रध्दांजली | राजकीय |
| ९ | २२ नोव्हेंबर | ४ | २२९.५ | 'आता म्होरल्या साली' | कृषी सल्ला |
| १० | २२ नोव्हेंबर | ५ | ८६७ | आंतरराष्ट्रीय उच्च तंत्रज्ञान कृषी सप्ताह | नवीन प्रयोग |
| ११ | २२ नोव्हेंबर | ६ | ४३३ | बेबी कॉर्न चे व्यवस्थापन | पीके |
| १२ | २२ नोव्हेंबर | ७ | ६४२ | नारळाच्या पानांपासून व्हर्मीवॉश पिकांच्या वाढीस फायदेशीर | नवीन प्रयोग |
| १३ | २२ नोव्हेंबर | ७ | २२५ | तामिळनाडू कृषी विद्यापीठातर्फे सुरुच्या लागवडीचा प्रसार | पर्यावरण |
| १४ | २२ नोव्हेंबर | ८/९ | १७३४ | आंतरराष्ट्रीय उच्च तंत्रज्ञान कृषी सप्ताह | नवीन प्रयोग |
| १५ | २२ नोव्हेंबर | १० | ८६७ | बाजारभाव | आयात निर्यात |
| १६ | २२ नोव्हेंबर | ११ | ५७५.२५ | सोयाबिन प्रक्रिया आणि उपपदार्थ निर्मिती | अन्नधान्य |
| १७ | २२ नोव्हेंबर | ११ | २५५.२५ | खाद्य प्रक्रिया उद्योगास भारतात मोठी संधी | अन्नधान्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | २२ नोव्हेंबर | १४ | २२० | कांदा प्रक्रिये बद्दल माहिती द्यावी | कृषी सल्ला |
| १९ | २२ नोव्हेंबर | १४ | ६० | हवामान | पर्यावरण |
| २० | २२ नोव्हेंबर | १४ | ३० | कृषी सल्ला | कृषी सल्ला |
| २१ | २२ नोव्हेंबर | १४ | ४४० | आठवड्याचा द्राक्ष सल्ला | फळे |
| २२ | २२ नोव्हेंबर | १५ | ८६७ | रेशीम किटक संगोपनाचे प्रकार | उद्योगधंदे |
| २३ | २२ नोव्हेंबर | १६ | २६० | हरिनामाच्या जयघोषाने पंढरी दुमदुमली | इतर बातम्या |
| २४ | २२ नोव्हेंबर | १६ | २६५ | संतप्त कांदा उत्पादकांचा धुळ्यात रास्ता रोको | आंदोलने |
| २५ | २२ नोव्हेंबर | १६ | ३३५ | कृषीच्या अमृतकुंभातून मिळाला आधुनिक शेतीचा मंत्रा | इतर बातम्या |

| क्र. | दिनांक | पान नं. | कॉलम सेमी | आशय (२९ नोव्हेंबर) | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २९ नोव्हेंबर | १ | ३९५.२५ | विद्यापीठाने संशोधनाला चालना द्यावी. | शैक्षणिक |
| २ | २९ नोव्हेंबर | १ | १६१ | कोकणात हापूसला थंडीची साथ | फळे |
| ३ | २९ नोव्हेंबर | १ | २२० | हिंगोली बाजारसमितीत पोलिस बंदोबस्त! | आंदोलने |
| ४ | २९ नोव्हेंबर | २ | २२८ | अग्रलेख | अग्रलेख |
| ५ | २९ नोव्हेंबर | २ | १६७.५ | शेतीतील तंत्रज्ञान महिलांना द्यावे | वाचकांचा पत्रव्यवहार |
| ६ | २९ नोव्हेंबर | २ | ३२३ | ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्याची गरज | इतर बातम्या |
| ७ | २९ नोव्हेंबर | ३ | २९३.२५ | जळगांव जिल्ह्यासाठी हरभरासह गव्हाच्या क्षेत्रवाढीचा प्रस्ताव पाठवण्यास मंजूरी | राजकीय |
| ८ | २९ नोव्हेंबर | ३ | १३८ | सोयगांव तालुक्यात ६१ वनराई बंधारे | नवीन प्रयोग |
| ९ | २९ नोव्हेंबर | ३ | १२० | किरजवळ्याचे सेंद्रिय सोयाबिन पोहोचले मध्यप्रदेशात | आयात निर्यात |
| १० | २९ नोव्हेंबर | ३ | १८७ | पुरंदरला पक्षांचा किलबिलाट अन् पर्यटकांची वर्दळ वाढू लागली ! | इतर बातम्या |
| ११ | २९ नोव्हेंबर | ४ | २२७.५ | आता सत्ताधाऱ्यांचा गदारोळ | आंदोलने |
| १२ | २९ नोव्हेंबर | ४ | १०४ | संशोधनाला चालना द्यावी ! राष्ट्रपती | नवीन प्रयोग |
| १३ | २९ नोव्हेंबर | ४ | १७८.२५ | कोकणच्या हापूसला थंडीची साथ | फळे |
| १४ | २९ नोव्हेंबर | ५ | १७४.२५ | पुण्यात 'एनएचएम' अंतर्गत गतीमान संपर्क मोहिम | इतर बातम्या |
| १५ | २९ नोव्हेंबर | ५ | २२० | तंटामुक्तीच्या माध्यमातून गावात दारुबंदीसाठी प्रयत्न | इतर बातम्या |
| १६ | २९ नोव्हेंबर | ५ | १३०.२५ | पडीक जमिनीत पीक लागवडीचा ऑरगॅनिक केमिकलचा उपक्रम | नवीन प्रयोग |
| १७ | २९ नोव्हेंबर | ५ | १७४.२५ | सोलापुरातील ६४ ग्रामपंचायतीच्या २३ रोजी निवडणुका | राजकीय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | २९ नोव्हेंबर | ६ | ४३३.५ | बटाटा लागवडीनंतरचे व्यवस्थापन | पीके |
| १९ | २९ नोव्हेंबर | ७ | ५९९.२५ | वीजनिर्मिती करणारी उंटगाडी | नवीन संशोधन |
| २० | २९ नोव्हेंबर | ७ | २८०.५ | 'जीएम' उत्पादनाबाबतच्या निकषात शिथीलता आणू नये. | नवीन प्रयोग |
| २१ | २९ नोव्हेंबर | ८ | ८६७ | वाशीच्या पवार कुटुंबियांची ऊसाची सुधारित शेती | नवीन प्रयोग |
| २२ | २९ नोव्हेंबर | ९ | ८६७ | नारीसुवर्ण मेंढीपालनाचे अर्थशास्त्र | नवीन प्रयोग |
| २३ | २९ नोव्हेंबर | १० | ८६७ | बाजारभाव | आयात निर्यात |
| २४ | २९ नोव्हेंबर | ११ | ८६७ | बाजारपेठेसाठी केळीची कापणी आणि साठवण | फळे |
| २५ | २९ नोव्हेंबर | १४ | १५३.७५ | खाया झाडाची लागवड कशी करावी? | कृषी सल्ला |
| २६ | २९ नोव्हेंबर | १४ | ६० | हवामान | पर्यावरण |
| २७ | २९ नोव्हेंबर | १४ | ३० | कृषी सल्ला | कृषी सल्ला |
| २८ | २९ नोव्हेंबर | १४ | ४२५ | आठवड्याचा द्राक्ष सल्ला | फळे |
| २९ | २९ नोव्हेंबर | १५ | ८६७ | किटकसंगोपनासाठी लागणारे आवश्यक साहित्य व त्याचे उपयोग | उद्योगधंदे |
| ३० | २९ नोव्हेंबर | १६ | ३३१.५ | खेळातून जीवनमूल्याची प्राप्ती... राष्ट्रपती | इतर बातम्या |
| ३१ | २९ नोव्हेंबर | १६ | १२० | महावितरणाच्या कारभारात हस्तक्षेपाचा राज्य वीज आयोगास अधिकार नाही. | वीज |
| ३२ | २९ नोव्हेंबर | १६ | २२९.५ | मूक-बधीर विद्यार्थ्यांचे पथनाट्य प्रथम | इतर बातम्या |
| ३३ | २९ नोव्हेंबर | १६ | १९३.७५ | फळ-भाज्यांच्या स्पर्धेत माने-राजेभोसले प्रथम | इतर बातम्या |

१, १ नोव्हेंबर २००७, दोन रुपये, पाने १६ पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव येथून प्रसिद्ध

# दूधदरात अखेर वाढ!

384.25

## गाईचे १.५०; म्हशीचे दोन रुपये



| प्रकार | फॅट/एसएनएफ | जुने दर* | नवीन दर |
|---|---|---|---|
| गाय | ३.५/८.५ | ९.०० | १०.५० |
| म्हैस | ६.०/९.० | १२.२० | १४.२० |

**मुंबई (प्रतिनिधी) : दूध खरेदी दरात वाढ करण्याचा निर्णय काल अखेर मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. नव्या निर्णयानुसार गाईच्या दूधदरात ३.५/८.५ फॅटला १.५०, तर म्हशीच्या दुधाला ६/९ फॅटला दोन रुपये प्रति लिटर वाढविण्यात येणार आहेत. एक नोव्हेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.**

दूध संघांच्या कमिशनमध्ये कोणतीही वाढ न करता ते पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आले आहे. दूध दरवाढीसंदर्भात नेमण्यात आलेल्या अशोक बसाक समितीच्या शिफारशींनुसार ही खरेदीवाढ देण्यात आली. ऐन सणासुदीच्या तोंडावर देण्यात आलेल्या या दरवाढीने शेतकऱ्यांना दिलासा दिला. विक्री दरातही कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. हे दर कृश व पुष्ट काळासाठी समान राहणार आहेत.

**पुण्यात संघांची आज बैठक**

राज्य सरकारने दूध खरेदी दरात केलेल्या वाढीसंदर्भात चर्चा करण्यासाठी जिल्हा व राज्यातील संघांना आज (गुरुवारी) पुणे येथे बोलविण्यात आले असल्याची माहिती, पुणे जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे यांनी 'ॲग्रोवन'ला दिली. ते म्हणाले, "शासनाने दीड रुपया वाढ केली आहे, यामुळे हा दर आता ३.५/८.५ करिता १०.५० रुपये प्रति लिटर होणार आहे. सर्व सहकारी संघांचे दर सारखेच राहावे म्हणून ही बैठक आयोजित करण्यात आली आहे."

दरम्यान, शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन दूध दरवाढ करण्यात आल्याची माहिती राज्याचे पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री अनिस अहमद यांनी 'ॲग्रोवन'शी बोलताना दिली.

### उत्कृष्ट गुणप्रतीला दरात वाढ!

**गाईच्या दुधाला** उत्कृष्ट गुणप्रतीसाठी प्रति पॉइंट ३० पैसे प्रति लिटर, ४.२ टक्के फॅटपर्यंत व त्यानंतर २० पैसे प्रति पॉइंट प्रति लिटर ४.५ % फॅट वाढ, **म्हशीच्या दुधाला** उत्कृष्ट गुणप्रतीसाठी ३० पैसे प्रति लिटर ७ % फॅटपर्यंत व त्यानंतर २० पैसे प्रति पॉइंट प्रति लिटर ७.५ टक्केपर्यंत वाढ करण्यात आली आहे. कृश व पुष्ट काळासाठी एक रुपया प्रति लिटर गाय व म्हैस दूध खरेदीदरात फरक ठेवण्यात येणार आहे, परंतु सध्याच्या कृश व पुष्ट काळात हे दर सारखेच राहतील.


### ३.३ % पर्यंतचे दूध स्वीकारणार!

गाईचे दूध ३.५ फॅटच्या खाली जाऊ शकत असल्यामुळे ३.३ टक्के फॅटपर्यंत दूध प्रति पॉइंट ५० पैसे कमी आकारून ते स्वीकारण्यात येईल. ५० हजार लिटरपेक्षा कमी दूध संकलन करणाऱ्या संघ व संस्थांना देण्यात येणारे ५५ पैसे प्रति लिटर कमिशन यापुढेही चालू ठेवण्यात येणार आहे. दूध खरेदी-विक्री दर ठरविण्याचे नवीन धोरण स्वीकारण्यासंदर्भात दुग्धविकास आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णयही या वेळी घेण्यात आला.

# शेतकऱ्यांनी दूध जिल्हा दूध संघातच घालावे : बाळासाहेब नेवाळे

**मंचर, जि. पुणे (प्रतिनिधी):** राज्यातील खासगी दूध प्रकल्पांकडून होणारी पिळवणूक व भविष्यातील धोका टाळण्यासाठी जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ टिकले पाहिजेत. त्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हा दूध संघांनाच दूध घालावे, असे आवाहन पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे यांनी केले.

आंबेगाव तालुक्यातील दूध उत्पादक सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. त्यांनी खासगी दूध प्रकल्पाच्या कार्यपद्धतीवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, "राज्यातील दूध उत्पादन वाढीसाठी सहकारी व जिल्हा दूध संघांनी मोलाची कामगिरी केली आहे, त्यामुळे दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे; परंतु खासगी दूध प्रकल्पांमुळे दुधाची गुणप्रत घसरली आहे. गावोगावी कमिशन एजंटांचा सुळसुळाट झाला असून, गट-तट निर्माण झाले आहेत. प्रामाणिकपणे व नियमानुसार काम करणाऱ्या सहकारी दूध संस्था अडचणीत आणण्यासाठी खासगी प्रकल्पांमार्फत जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात, त्यामुळे दूध संस्था व दूध उत्पादकांना भविष्य काळात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. जिल्हा संघामुळे दूध उत्पादकांना चांगला दर मिळण्यास मदत झाली आहे. अनेकदा शासनाकडे पाठपुरावा करून दुधाचे दर वाढविण्यासाठी जिल्हा संघांचे मोठे योगदान आहे. आर्थिक आमिष दाखवून खासगी व्यक्ती दुधाचे संकलन करतात. त्यांच्यावर गुणप्रत टिकविण्याचे बंधन राहिलेले नाही, त्यामुळे येत्या तीन वर्षांनंतर जिल्हा सहकारी दूध संघ बंद पडण्याची भीती आहे. त्यानंतर खासगी प्रकल्प एकत्रितपणे साखळी तयार करून दुधाचे बाजारभाव ठरवतील. परिणामतः दूध उत्पादकांची ससेहोलपट होईल.


बाळासाहेब नेवाळे

भविष्यातील हा धोका लक्षात घेऊन दूध संस्थांनी योग्य निर्णय घेण्याची गरज आहे. संघाला दूधपुरवठा केल्यानंतर वजन व गुणप्रतीबाबत अडचणी असल्यास त्या ताबडतोब सोडविल्या जातील. आंबेगाव तालुक्यातील सहकारी दूध संस्थांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे, त्यामुळे संघाच्या संकलनात वीस हजार लिटर्स दुधाची वाढ अपेक्षित आहे. संघामार्फत दूधवाढीसाठी लवकरच धोरणात्मक निर्णय जाहीर केले जातील."

या वेळी संचालक ॲड. विष्णू हिंगे-पाटील, संचालिका सौ. अल्का इंदोरे, कार्यकारी संचालक डॉ. विवेक क्षीरसागर, जिल्हा परिषद सदस्य अरुण गिरे, सभापती आनंदराव शिंदे, गणपतराव इंदोरे यांची भाषणे झाली. केंद्र प्रमुख अशोक जाधव यांनी प्रास्ताविक केले.

अॅग्रोवन : गुरुवार, २५ ऑक्टोबर २००७ /५

मऱ्हाटी मुलखात

# दुधाच्या दरातील कपातीचा उत्पादकांना फटका

संजय साळुंखे 216·75

**सातारा :** दूध खरेदीचा दर वर्षभर एकच ठेवण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा, बसाक समितीच्या अहवालानंतर दूध दरवाढ करण्यासंबंधी मिळालेले आश्वासन व दूध दरवाढ आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दूध दरवाढ मिळणे अपेक्षित असताना दुधाच्या दरात प्रति लिटर एक रुपया कपात करण्याच्या निर्णयाने शेतकऱ्यांना धक्का बसला आहे. एक रुपयाच्या कपातीमुळे सातारा जिल्ह्यातील दूध उत्पादकाला दररोज सहा लाख रुपयांचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसणार आहे.

शेतकऱ्यांकडून नऊ रुपयांच्या आसपास खरेदी केलेले दूध किरकोळ प्रक्रिया केल्यानंतर ग्राहकाच्या हाती पडते, त्या वेळी त्याची किंमत तिपटीने वाढलेली असते.

दूध संघांच्या व्यवहारात एक ऑक्टोबर ते ३१ मार्च हा पुष्ट काळ मानला जातो. या काळात पावसाळ्यानंतर ओला चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो, शिवाय दुभत्या जनावरांचा प्रजनन काळही जास्त असतो; त्यामुळे जास्त दूध उपलब्ध होत असल्याने खरेदी दर एक रुपयांनी कमी करण्यात येतो. एक एप्रिल ते ३० सप्टेंबर हा कृश काळ मानला जातो. या काळात उन्हाळ्यामुळे चाराटंचाई व पाणीटंचाई असते. अनुकूल नैसर्गिक परिस्थिती नसल्यामुळे या काळात जनावरांचे दूध देण्याचे प्रमाणही कमी होते, त्यामुळे या काळात संकलित होणाऱ्या दुधाला प्रति लिटर एक रुपया जादा दर दिला जातो. दूध संघांनी उन्हाळी व हिवाळ्यामध्ये दुधाच्या उपलब्धतेनुसार दुधाचे दर निश्चित केले असले, तरी त्याचा बाजारपेठेवर कधीही परिणाम होताना दिसत नाही.

शासनाने प्रति लिटर एक रुपया दर कमी करण्याचा निर्णय घेतला असला तरी त्याचा फटका सामान्य दूध उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे.

सातारा जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून सध्या दररोज पाच लाख ९२ हजार १४६ लिटर दूध संकलित केले जात आहे. जिल्ह्यात १८ खासगी प्रकल्प व चार नोंदणी न केलेले प्रकल्प आहेत. त्याशिवाय दहा संघांच्या माध्यमातूनही दूध संकलित केले जाते. १८ खासगी प्रकल्पांमध्ये सध्या चा लाख ५६ हजार ७०० लिटर, नोंद नसलेल्य प्रकल्पात ३८ हजार ३००, संघांकडे ९७ हजा १४६ लिटर्स दूध संकलित करण्यात येत आहे.

प्रकल्पनिहाय दुधाचे होणारे संकलन :

खासगी प्रकल्प : स्वराज - एक लाख २७ हजा लिटर, गोविंद - एक लाख १९ हजार ९००, विक्रम - ४३ हजार ६००, मोरया - ४० हजार, ब्रह्मचैतन्य - १५ हजार, ग्रीन व्हॅली - २९ हजार ७०० जनता बझार - १६ हजार, संतोष - १६ हजार अष्टविनायक - १८ हजार, चैतन्य अॅग्रो - पाच हजा ३००, तेजस मिल्क - दहा हजार, सनशाईन - आठ हजार २००, माणगंगा - आठ हजार.

# दूध उत्पादनवाढीसाठी द्विदल चारा



**अमेरिकेतील हवाई विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे एक शास्त्रज्ञ डॉ. बृबेकर म्हणाले, की जगातील सर्व वनस्पतींमध्ये सुबाभूळ हे झाड मला फार उपयुक्त वाटले, कारण हे झाड द्विदल वर्गातील असल्याने त्याच्या पानांत प्रथिनांचे प्रमाण २५ ते ३० टक्के असते. म्हणून ही पाने दुभत्या जनावरांना चारा म्हणून जर उपयोग केला तर त्यांच्या दुधाची उत्पादकता वाढू शकेल.**

ऑस्ट्रेलिया खंडात क्वीन्सलँड नावाचे राज्य आहे. तेथे भारतासारखे उष्ण कटिबंधातील (Tropical) हवामान आहे. ब्रिस्बेन शहरात क्वीन्सलँड विद्यापीठ व कॉमनवेल्थ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ऑर्गनायझेशन (C.S.J.R.O.) नावाच्या दोन संशोधन संस्था आहेत. त्या दोन्ही संस्थांनी उष्ण कटिबंधातील चाऱ्याचे फार मौलिक संशोधन केले आहे.

क्वीन्सलँड विद्यापीठातील डॉ. एल. आर. हंफरे हे चाराशास्त्रज्ञ मला तेथील गवती कुरणे दाखविण्यास घेऊन गेले. या कुरणात स्टायलोझँथिस हमाटा नावाचे द्विदल वर्गातील चाऱ्याचे पीक वाढले होते. डॉ. हंफरे म्हणाले, की आमच्या गवती कुरणात पूर्वी फक्त गवते होती. द्विदल वर्गातील चारा पिके नव्हती, परंतु आम्ही जगभरातील उष्ण कटिबंधातील देशांत फिरून द्विदल वर्गातील चारापिके गोळा केली व त्यांचे बी आणून ते आमच्या संशोधन केंद्रातील जमिनीत पेरले व त्यावर प्रयोग केले. त्यातील स्टायलोझँथिस हमाटा हे चारा पीक आम्हास योग्य वाटले, कारण ते बहुवर्षीय असून ते एकदा लावले, की चार ते पाच वर्षे टिकू शकते. शिवाय त्याला भरपूर बी येते व त्याचा प्रसार होतो. महत्त्वाचे म्हणजे हे पीक कोरडवाहू भागातही होऊ शकते. आमच्या ऑस्ट्रेलियाचा बहुसंख्य भाग हा कोरडवाहू असून, येथे पाऊसही फार पडतो. त्यामुळे स्टायलोझँथिस हमाटा हे चारा पीक आम्हास वरदान ठरले आहे. स्टायलोझँथिस हमाटात १५ ते २० टक्के प्रथिने असतात. ते हिरवे असताना किंवा वाळवून चारा म्हणून दुभत्या जनावरांना देता येते. हे पीक पेरणीनंतर चार ते पाच महिन्यांत तयार होते.

डॉ. हंफरे यांनी भारताला भेट देऊन येथील चारा संशोधनाचा अभ्यास केला होता. ते म्हणाले, की भारतातील कोरडवाहू भागातील दुभत्या जनावरांची दुधाची उत्पादकता जर वाढवायची असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने स्टायलोझँथिस हमाटाची लागवड केली पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठांच्या चारा संशोधन केंद्राशी संपर्क साधून स्टायलोझँथिस हमाटाच्या बियांचे नमुने मिळवावे व त्यांची पावसाच्या सुरवातीस लागवड करावी. एकदा लागवड केली, की त्यापासून जे बी निर्माण होईल त्याचा आपोआप प्रसार होईल. आज देशात सकस चाऱ्याची बीजोत्पादन केंद्रे नाहीत.

**डॉ. जयंतराव पाटील**

त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपले बी उत्पादन केले पाहिजे.

अमेरिकेतील हवाई विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे एक शास्त्रज्ञ आहेत. त्यांचे नाव आहे. डॉ. विल्यम बृबेकर. त्यांनी सुबाभूळ या चाऱ्याच्या झाडाच्या संशोधनास त्याचे जीवन समर्पित केले आहे. त्यांना भेटण्याची मला संधी प्राप्त झाली. तेव्हा ते म्हणाले, की जगातील सर्व वनस्पतींचा मी अभ्यास केला. तेव्हा त्यात सुबाभूळ हे झाड मला फार उपयुक्त वाटले, कारण हे झाड द्विदल वर्गातील असल्याने त्याच्या पानांत प्रथिनांचे प्रमाण २५ ते ३० टक्के असते. म्हणून ही पाने दुभत्या जनावरांना चारा म्हणून जर उपयोग केला तर त्यांच्या दुधाची उत्पादकता वाढू शकेल. शिवाय हे झाड अत्यंत काटक असून, ते कोरडवाहू जमिनीतही येऊ शकते. त्याशिवाय या झाडाला वर्षातून दोन वेळा बी येते व हे बी मोठ्या प्रमाणात येत असल्याने त्याचा प्रसार फार जलद होतो.

डॉ. बृबेकर म्हणाले, की मी हे विचार अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमोर (United States Agency for International Development - USAID) व्यक्त केले. त्यांनी मला लगेच प्रतिसाद दिला व त्याप्रमाणे आशिया खंडात सुबाभूळचा प्रसार करण्याकरिता कार्यक्रम हाती घेतला. सर्वप्रथम के ८ जातीचे बियाणे सर्व देशांना पुरविण्यात आले. त्या सर्व देशांत जर कोणत्या एका देशाने सर्वाधिक प्रतिसाद दिला असेल तर तो फिलिपिन्स या देशाने होय. त्या देशातील प्रत्येक शेतकऱ्याने सुबाभूळची लागवड केली आहे. देशातील सर्व पडीक जमिनींवर, तसेच रस्त्याच्या दुतर्फा सुबाभूळची लागवड करण्यात आली आहे. तेथले लोक सुबाभूळला इपिल - इपिल (Ipil - Ipil) म्हणतात. सारे फिलिपिन्स राष्ट्र इपिल - इपिलने व्यापून टाकले आहे, असे मला पाहावयास मिळाले.

सुबाभूळचा हिरवा पाला दुभत्या जनावरांना चारा म्हणून ते देतातच, परंतु हा पाला सावलीत वाळवून तो पोत्यात भरून ठेवतात व त्याचा पशुखाद्यात वापर केला जातो. त्यामुळे पशुखाद्याच्या खर्चात बचत होते.

डॉ. बृबेकर मला म्हणाले, की भारतातील कोरडवाहू भागातील जे शेतकरी दुग्ध व्यवसाय करतात त्या प्रत्येक शेतकऱ्याने सुबाभूळची लागवड केली पाहिजे. त्याद्वारे त्यांच्या दुभत्या जनावरांना सकस चारा प्राप्त होईल व त्या जनावरांची दूध देण्याची उत्पादकता वाढू शकेल.

■ वर्ष : ३, अंक : १७४ मुद्रक व प्रकाशक : श्री. अभिजित प्रताप पवार ■ संपादक : निशिकांत अनंत भालेराव ■* सहयोगी संपादक : सुनील श्यामराव चव्हाण (*पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी) ■ सकाळ पेपर्स लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक श्री. अभिजित प्रताप पवार यांनी १) सकाळ पेपर्स लिमिटेड, क्र. ७८९/२ वडकीनाला, पुणे-सासवड रोड, वडकी, ता. हवेली, जि. पुणे - ४१२ ३०८, २) सकाळ प्रिंटिंग प्रेस नं. ४२ बी, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. ३) सकाळ प्रिंटिंग प्रेस, डी-४, एम.आय.डी.सी., शिरोली, कोल्हापूर - ४१६ १२२, ४) सकाळ पेपर्स लिमिटेड - द्वारा विकास इलेक्ट्रिकल्स अँड सिरॅमिक प्रा. लि., प्लॉट ३२, एम.आय.डी.सी., सातपूर - त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००७, ५) सकाळ पेपर्स लिमिटेड, प्लॉट नं. सी - ३, एम.आय.डी.सी. एरिया, टेलिफोन एक्स्चेंज जवळ, औरंगाबाद रोड, जळगाव - ४२५ ६) सकाळ पेपर्स लिमिटेड, डी -३५, ॲडिशनल एम.आय.डी.सी. एरिया, आय.टी.आय.जवळ, जालना - ४३१ २३०, ७) सकाळ पेपर्स लिमिटेड, प्लॉट नं. ए-१९/३, एम.आय.डी.सी., चिंचोली, सोलापूर - ४१३ २५५, ८) सकाळ पेपर्स लिमिटेड, बी - ३२/३३, एम.आय.डी.सी., हिंगणा, नागपूर - ४४० ०१६ येथे मुद्रित केले व सकाळ पेपर्स लिमिटेड, ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रकाशित केले. ■ 'ॲग्रोवन'मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत.